# प्रभारी कुलगुरूंनी साधला संवाद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी गुरुवारी अधिकाऱ्यांसमवेत संवाद साधला. त्यांनी प्रशासन, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, आदी विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. डॉ. करमळकर यांनी सकाळी कुलसचिव, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक, वित्त व लेखाधिकारी, विविध विभागांच्या संचालकांची बैठक घेतली. उपकुलसचिवांसमवेत त्यांनी दुपारी संवाद साधला. दरम्यान, मावळते कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या निरोप समारंभासाठी आमंत्रित केले नसल्याबद्दल विद्यापीठ कर्मचारी संघाने संयोजकांचा निषेध केला आहे, अशी माहिती संघाचे अध्यक्ष सुनील देसाई यांनी दिली.